महापार ऑनलाईन कार्यमुल्यमापन
अहवाल प्रणालीबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक : महाप्र २०१८/प्र.क्र.६५/विशा-८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०३ मे, २०१८

वाचा : शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक सीएफआर १२१७/प्रक्र १३१/तेरा दिनांक १५.१२.२०१७

प्रस्तावना:-

संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये महापार (MahaPAR) या ऑनलाईन कार्यमूल्यमापन अहवाल नोंदविण्याच्या प्रणालीत सन २०१७-१८ पासून सर्व गट "अ" व "ब" (राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांचे कार्यमूल्यमापन अहवाल ऑनलाईन पध्दतीने नोंदविण्याचे प्रस्तावित आहे. तसेच संदर्भाधीन परिपत्रकान्वये या अधिकाऱ्यांच्या सेवेचे नियंत्रण करणारे सहसचिव / उपसचिव यांना "समन्वय अधिकारी" तसेच संवर्ग नियंत्रण अधिकारी (Cader Controlling Authority) म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे संबंधित सेवेचे नियंत्रण करणाऱ्या मंत्रालयातील संबंधित कार्यासनांचे अवर सचिव / कक्ष अधिकारी यांना "माहिती व्यवस्थापक" (EMD Manager) घोषित करण्यात आले आहे.

होमगार्ड, महाराष्ट्र राज्य व नागरी संरक्षण संचालनालय या दोन कार्यालयाकरीता अतिरिक्त परिरक्षकांसाठी विभागीय/ प्रादेशिक स्तरावर एका प्राथमिक परिरक्षकाची (Primary Custodian), संबंधित अधिकाऱ्यांचे "कोषागार / उपकोषागारनिहाय किंवा कार्यालयनिहाय युनिट" (Organization Unit (OU)) तसेच आवश्यकतेनुसार अतिरक्त परिरक्षकाची नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

होमगार्ड, महाराष्ट्र राज्य व नागरी संरक्षण संचालनालय या दोन कार्यालयाकरीता खालीलप्रमाणे प्राथमिक परिरक्षकाची (Primary Custodian), "कोषागार / उपकोषागारनिहाय किंवा कार्यालयनिहाय युनिट" (Organization Unit (OU)) व अतिरक्त परिरक्षकाची नियुक्ती करण्यात येत आहे :-

क्र.	कार्यालयनिहाय युनिट (Organization Unit	प्राथमिक परिरक्षक (Primary Custodian)	अतिरक्त परिरक्षक (Alternative Custodian)
१	महासमादेशक, होमगार्ड कार्यालय, मुंबई	उपनियंत्रक,नागरी संरक्षण, क्षेत्र १, बृहन्मुंबई	कनिष्ट प्रशासिक अधिकारी, होमगार्ड कार्यालय, मुंबई
२	संचालक, नागरी संरक्षण संचालनालय	उपनियंत्रक,नागरी संरक्षण, क्षेत्र १, बृहन्मुंबई	उपनियंत्रक (समन्वय व नियोजन),नागरी संरक्षण, बृहन्मुंबई

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०५०३१७२८४८२६२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Deepak Vasant Sawant

Digitally signed by Deepak Vasant Sawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=43cdfecb6fd26ff7b1b970520962ebf72d86546b92151214820b2bb31f3ccac8, serialNumber=66ea8e25496abe127ddbfd3157e10ae5a1fb12e738b63f8a5b2cb92885fd1f05, cn=Deepak Vasant Sawant
Date: 2018.05.05 10:33:03 +05'30'

(दि.व. सावंत)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महासमादेशक, होमगार्ड, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. संचालक, नागरी संरक्षण संचालनालय, मुंबई
३. उपमहासमादेशक,होमगार्ड, मुंबई
४. उपनियंत्रक,नागरी संरक्षण, क्षेत्र १, बृहन्मुंबई
५. उपनियंत्रक(समन्वय व नियोजन),नागरी संरक्षण, बृहन्मुंबई
६. कनिष्ट प्रशासिक अधिकारी, होमगार्ड कार्यालय, मुंबई
७. सामान्य प्रशासन विभाग (१३),मंत्रालय, मुंबई.
८. निवड नस्ती, विशा-८, गृह विभाग, मंत्रालय,मुंबई.